**<u>वादपत्र निशाणी क्रमांक ०१ वर आदेश</u>**

(पारीत केल्याची तारीख **१२.०१.२०१८**)

**०१.** वादींचे अखत्यारी हजर व वादींतर्फे विधीज्ञ श्री. एस्. एन्. सानप हजर. प्रतिवादी क्रमांक ०१ हजर. प्रतिवादी क्रमांक ०२ गैरहजर प्रतिवादींतर्फे विधीज्ञ श्री.एम. डी. पाटील हजर.

**०२.** प्रतिवादी क्रमांक ०१, ०२ यांना दावा समन्स **<u>नि.क्र.०६</u>** ची दिनांक १३.१०.२०१७ रोजी बेलिफ अहवालानुसार प्रत्यक्ष बजावणी झाली आहे. प्रतिवादी क्रमांक ०१, ०२ यांनी आज मुदत अर्ज दाखल केला नाही किंवा कैफियत दाखल केली नाही.

**०३.** प्रतिवादी क्रमांक ०१ व ०२ यांनी **<u>दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चा क्रम ०८ नियम ०१ सह वाचनीय क्रम ०५ नियम ०१</u>** नुसार मुदतीत कैफियत दाखल केली नाही. म्हणून त्यांच्याविरुद्ध **<u>दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चा क्रम ०८ नियम १०</u>** नुसार दावा **''विना कैफियत''** चालवण्याचा आदेश पारीत करणे न्यायाचे होईल. म्हणून खालील आदेश पारीत करण्यात येतो.

## <u>आ दे श</u>

**०१.** प्रतिवादी क्रमांक ०१ व ०२ यांनी मुदतीत कैफियत दाखल केली नाही म्हणून त्यांच्याविरुद्ध **<u>दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चा क्रम ०८ नियम १०</u>** नुसार दावा **''विना कैफियत''** चालवण्यात येतो.

**---स्वाक्षरी---**
**(सुभाष ल. फुले)**
**(एम एच आर जी ०००९ - २१२५)**
**स्थळ : रोहा** **दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, रोहा.**
**दिनांक : १२.०१.२०१८** **जिल्हा रायगड**